आकाशवाणी पुणे

प्रादेशिक वृत्त विभाग

पुणे वृत्तांत

वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक- 06.10.2024 वार – रविवार

डॉ.तारा भवाळकर

नवी दिल्लीत होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. येत्या २१,२२ आणि २३ फेब्रुवारी रोजी दिल्लीतल्या तालकटोरा स्टेडीअममध्ये हे मराठी साहित्य संमेलन होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडीबाबत महामंडळ आणि इतर सहयोगी संस्था प्रतिनिधिंची आज पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेत बैठक झाली; त्यानंतर पत्रकार परिषदेत डॉक्टर भवाळकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

अजित पवार

लोहगाव आणि वाघोलीला पुरेसा पाणीपुरवठा व्हावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. येरवडा, शास्त्रीनगर आणि खराडीतल्या विविध विकास कामांचं उद्घाटन पवार यांच्या हस्ते काल झालं; त्यावेळी ते बोलत होते.

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत उद्याने, रस्ते, पाणी या विभागासह समाविष्ट गावांमधील सुमारे ९० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या १६० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे.
विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता असल्याने विकासकामं रखडू नयेत, यासाठी महापालिका प्रशासनाने तातडीने प्रस्ताव तयार केले आहेत.

भोंडला

नवरात्र उत्सवात पुण्यात विविध देवी मंदिरांमध्ये आदिशक्तीची आराधना सुरू आहे. आणि त्याचबरोबर अनेक सामाजिक सांस्कृतिक उपक्रमही घेण्यात येत आहेत. चतुःशृंगी देवस्थान ट्रस्ट आणि सुयोग मित्र यांनी 'निवारा वृध्दाश्रमा'तील आजींसाठी भोंडल्याच आयोजन आज केलं होतं. गेली दहा वर्षे हा उपक्रम सुरू आहे.

पथ संचलन

राष्ट्र सेविका समितीनं विजयादशमी उत्सवाच्या निमित्तानं आज पुण्यातील कर्वेनगर परिसरात सघोष पथसंचलन केलं. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेमध्ये, महर्षी कर्वे आणि बाया कर्वे यांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर शस्त्रपूजन, ध्वजारोहण आणि ध्वजवंदन झालं. शिस्तबद्ध आणि सुंदर अशा या पथसंचलनाचं नागरिकांनी खूप उत्साहाने मोठ्या संख्येने चौकाचौकात उपस्थित राहून स्वागत केले.

## पुस्तक प्रकाशन

सोशल मिडिया आणि डिजिटल माध्यमांच्या आजच्या जगात मुद्रित माध्यमातील बातम्या अजूनही विश्वासार्ह असून पत्रकार, राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन काम केलं तर विकसित भारत अस्तित्त्वात येईल, असं प्रतिपादन खासदार मेधा कुलकर्णी यांनी आज पुण्यात केलं. ज्येष्ठ पत्रकार आणि आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागातील माजी हंगामी वृत्तनिवेदक अविनाश गोडबोले यांनी लिहलेल्या ऐसी अक्षरे मेळविली या पुस्तकाचं प्रकाशन ज्येष्ठ संपादक अरविंद गोखले यांच्या हस्ते आज करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर, मराठी भाषेची शुद्धता टिकवण्याचा प्रयत्न नवीन पिढीतील मराठी पत्रकारांनी केला पाहिजे अस मतही मेधा कुलकर्णी यांनी यावेळी व्यक्त केल. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक रतनाल सोनग्रा, माजी आमदार उल्हास पवार, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. पत्रकारितेच्या जुन्या काळात डोकवायचे असेल तर ऐसी अक्षरे मेळविली हे पुस्तक नक्कीच माहितीपूर्ण ठरेल; पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी हे पुस्तक अवश्य वाचावं. असं अरविंद गोखले यावेळी म्हणाले.

## सामूहिक अत्याचार प्रकरण

पुण्यातील बोपदेव घाटात तरुणीवर झालेल्या सामुहिक बलात्कार प्रकरणी तीन हजार मोबाइल वापरकर्त्यांची माहिती पोलिसांनी संकलित केली आहे. त्याआधारे पोलिसांकडून तांत्रिक विश्लेषण सुरू करण्यात आले आहे. या प्रकरणी दोनशेहून अधिक सराईतांची चौकशी करण्यात येणार आहे.

घाटापासून ७० ते ८० किलोमीटरपर्यंतचं  सीसीटीव्ही चित्रीकरण संकलित करण्यात येणार आहे. अशी माहिती पोलीस उपायुक्त आर राजा यांनी दिली आहे.

दंडात्मक कारवाई

पुणे प्रादेशिक परिवहन म्हणजे आरटीओ कार्यालयाकडून गेल्या सहा महिन्यापासून एक हजार २४ शालेय वाहनांची तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये ३३८ वाहन दोषी आढळले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी दिली. वानवडी इथल्या प्रकारानंतर कारवाईचा वेग वाढविण्यात आला आहे.

बाजार समिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. टोमॅटो कोबी मटार सिमला मिरची शेवगा यांचे भाव वाढले आहेत. पालेभाज्यांमध्ये राजगिरा भाजी तेजीत कोथिंबीरीच्या भावातही 10 ते 20 टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवण्यात आली. शोभिवंत फुलांपेक्षा पारंपरिक फुलांना मागणी असल्याने बहुतांश फुलांचे भाव 20 टक्क्यांपर्यंत वाढले आहेत.

क्रीडा

पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटनेतर्फे राज्य निवड चाचणी स्पर्धा पुण्यात सुरू आहे. यामध्ये पुण्याच्या आरव संचेती, प्रसाद परांडे, अमर राईकर,

निमिष कुलकर्णी, मुर्तजा अझदार यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून संघर्षपूर्ण विजय नोंदविला.

निधन

मराठी चित्रपटसृष्टीतील पहिल्या बाल तारका, वासंती घोरपडे - पटेल ह्यांचं आज पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. त्या 101 वर्षांच्या होत्या.

हवामान

पुणे आणि परिसरात उद्या वीजांसह पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे. कमाल तापमान 33 अंश सेल्सियस राहील.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.

---